## स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)

### तालुका प्लास्टिक कचरा व्यवस्थापन युनिट चालवणे (MRF Material Recovery Facility) साठी नेमणूक

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा क्र.२ अंतर्गत जिल्हा परिषद,जळगांव मध्ये १५ तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित ठेवणेसाठी व जिल्हयातील १४८६ गावांतुन विना मोबदला प्लास्टीक कचरा संकलन करुन सदर कच-यावर प्रक्रिया करणेसाठी ३ वर्षे कालावधीकरीता Material Recovery Facility कचरा संस्थेची नेमणूक होणे कामी इच्छुक व पात्र संस्था/कंपनी/बचत गट यांचे कडून EOI प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.संस्था/कंपनी/बचत गट निवड होणेसाठी कामकाजासंबंधी माहिती व संस्था/कंपनी/बचत गट अर्हता व पात्रता किंवा प्रस्तावासोबत अत्यावश्यक कागदपत्र,नेमणूकी बाबतचे अटी शर्ती https://zpjalgaon.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. सदर अटी व शर्तीसह व आवश्यक सर्व कागदपत्रासह प्रस्ताव दि.३१/१२/२०२५ संध्या ५.०० वाजेपर्यंत अंतर्गत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,जि.प.जळगांव येथे जमा करण्यात यावे.

मिनल करनवाल (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगांव

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

## स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)

## प्लास्टिक कचरा व्यवस्थापन युनिट (PWMU)

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा क्र.२ अंतर्गत जिल्हा परिषद,जळगांव मध्ये १५ तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित ठेवणेसाठी व जिल्हयातील १४८६ गावांतुन विना मोबदला प्लास्टीक कचरा संकलन करुन सदर कच-यावर प्रक्रिया करणेसाठी ३ वर्षे कालावधीकरीता Material Recovery Facility कचरा संस्थेची नेमणूक होणे कामी इच्छुक व पात्र संस्था/कंपनी/बचत गट यांचे कडून EOI प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.संस्था/कंपनी/बचत गट यांची निवड होणेसाठी संस्था/कंपनी बचत गट अर्हता/पात्रता किंवा प्रस्तावासोबत आवश्यक कागदपत्र खालील प्रमाणे.

१.शासनाचे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ नुसार नोंदणी प्रमाणपत्र (Shop Act Licence) किंवा

२.पॅन कार्ड/उदयम आधार कार्ड प्रत.

३.तिन वर्ष आयकर रिटर्न पुरावा तसेच (GST) प्रमाणपत्र छायांकित प्रत.

४.संस्था किंवा कंपनी आर्थिक क्षमता प्रमाणपत्र –कंपनीचे मागील दोन आर्थिक वर्षाचे किमान १ कोटी पेक्षा जास्त उलाढाल CA प्रमाणपत्र किंवा बँक गॅरंटी प्रगाणपत्र (बचत गटांना अट शिथील)

५.प्लास्टिक पुर्नचक्रिकरण संलग्न कामे किमान ३ वर्ष केले असल्याचा अनुभव प्रमाणपत्र.

६.प्रस्ताव सादर करणारी संस्था किंवा कंपनी ही अधिकृत प्लास्टिक पुर्नप्रक्रिया Recyler असल्याचे MPCB कडील प्रमाणपत्र किंवा प्रस्तावित संस्था किंवा कंपनी यांचे MPCB ने मान्यता दिलेल्या किमान ३ प्लास्टिक पुर्नप्रक्रिया Recyler कंपनी सोबत असलेले कराराची प्रत सोबत जोडणे आवश्यक असेल करार असल्यास प्राधान्य,

कामाचे स्वरुप (Scope of Work) प्रत

जळगांव जिल्हयातील १५ तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष प्रकल्प चालविणे,सर्व प्रकल्पाची देखभाल दुरुस्ती,तालुक्यातील प्रत्येक गावातुन ( जिल्हयातील एकुण १४८६ गावांमधुन ) ग्रामपंचायतींना कोणताही मोबदला न देता गावस्तरावरील प्लास्टीक संकलन शेडमधून प्लास्टिक कचरा संकलीत करणे,गोळा झालेले प्लास्टिक वेस्ट वर मशीन व्दारे प्लास्टीक कचरा व्यवस्थापन युनिट मध्ये प्रक्रिया करणे ( स्वच्छ करणे,तुकडे करणे व बंडल तयार करणे इ.) प्लास्टिक MPCB कडून मान्यता प्राप्त पुर्नचक्रीकरण संस्था कडे वर्ग करणे यासाठी मटेरियल रिसायकलिंग सुविधा किंवा साहित्य पुर्नप्राप्ती सुविधा किंवा मल्टी री-युज सुविधा (MRF Material Recovery Facility) म्हणून काम करणे,व यावाबत गाव निहाय गोळा केलेल्या प्लास्टीक कच-याचे वजन कि.लो सह तसेच प्लास्टीक व्यवस्थापन कक्षात प्रक्रिया केलेले प्लास्टीक कचरा पुर्नचक्रिकरण संस्था किंवा कंपनी कडे वर्ग केलेले वजन कि.लो सह मासिक अहवाल संबधित गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना देणे.सदर प्रक्रिये साठी (On Line) सॉफटवेअर तयार करुन गावनिहाय अहवाल करणे इ.

<u>अटी शर्ती</u>

१.प्रस्ताव सादर करणारी संस्था किंवा कंपनी ही अधिकृत प्लास्टिक पुर्नप्रक्रिया (Recyler) असल्याचे संस्था/कंपनी यांचे MPCB ने मान्यता दिलेल्या किमान ३ अधिकृत प्लास्टिक पुर्नप्रक्रिया (Recyler) कंपनी सोबत असलेले कराराची प्रत सोबत जोडणे आवश्यक असेल.

२.निवड केलेल्या संस्था/कंपनी बचत गट सोबत जिल्हा परिषद,जळगांव मार्फत उपरोक्त कामासाठी ३ वर्षाच्या कालावधीसाठी करार करण्यात येईल सदर काम समाधानकारक असल्यास पुढिल कालावधी वाढविणेचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.जळगांव यांचे राहील.सदर कालावधी समाप्त झाले नंतर तालुका प्लास्टीक व्यवस्थापन युनिट वर कोणताही हक्क संस्था किंवा कंपनीचा नसेल.

३.निवड करण्यात आलेल्या संस्था किंवा कंपनी यांनी प्रत्येक तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष याची वरील कालावधीसाठी नियमित देखभाल दुरुस्ती,आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरविणे व त्यांनी मजुरी प्रदान करणे,सदर प्रकल्पाचे विज व पाणी बिल अदा करणे इ.साठीचा लागणारा खर्च स्वतः करणे बंधनकारक असेल.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

४.प्रत्येक तालुक्यातील गावांचा प्लास्टिक कचरा वर प्रक्रिया करणेकामी तालुकास्तरीय, Material Recovery Facility केंद्र/प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेन्ट युनिटचे शेड,प्लास्टिक श्रेडर मशिन,प्लास्टिक बेलिंग मशिन व डस्ट रिमुव्हर मशिन आणि या व्यतिरिक्त प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्षास लागणारे,शेड,संरक्षक भिंत,कचरा वाहनासाठी प्लॅटफॉर्म व शेडमध्ये कचरा विलगीकरण झालेनंतर वर्गीकृत कचरा साठविणेसाठी लागणारे कप्पे,नळ कनेक्शन व विज सुविधा इ.सुविधा असलेले तालुका प्लास्टीक युनिट/केंद्र स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा क्र.२ जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,जि.प.जळगांव व ग्रामपंचायत मार्फत उपलब्ध करुन देण्यांत येणार आहे.सदर युनिट /केंद्र चालविणे साठी नेमणुक केलेल्या Material Recovery Facility संस्था/कंपनी/बचत गट कडून जिल्हा परिषद,जळगांव किंवा शासना मार्फत कोणताही भाडे आकारण्यात येणार नाही.मात्र उपरोक्त मशीन व शेड दिर्घ कालावधीसाठी कार्यान्वित राहणे करीता नेमणूक केलेल्या संस्था/कंपनी बचत गट यांना तालुका प्लास्टीक व्यवस्थापन युनिट मधील वरील सर्व घटकांची देखभाल दुरुस्ती करणें अनिवार्य असेल.या बाबतचे हमी पत्र देणे संस्था/कंपनी/बचत गट यांना बंधनकारक असेल.

५.निवड करण्यांत आलेल्या संस्था/कंपनी/बचत गट यांनी प्रत्येक ग्रामपंचायती हद्दी मधील गावस्तरीय कचरा संकलन केंद्र येथुन संकलित करणेसाठी वाहतुक स्वखर्चाने करावयाची आहे.त्यासाठी ग्रामपंचायत,पंचायत समिती व जिल्हा परिषद जळगांव यांचे व्दारे कोणताही खर्च अथवा साधन सामुग्री उपलब्ध करुन देण्यांत येणार नाही.

६.निवड करण्यांत आलेल्या संस्था/कंपनी बचत गट यांनी तालुकानिहाय व ग्रामपंचायतनिहाय प्लास्टिक कचरा संकलनाचे नियोजन करुन प्रत्येक गावांचे नियमित प्लास्टीक कचरा संकलित करणे बंधनकारक असेल.यासाठीचा गावनिहाय कचरा संकलन साठी वाहन फिरतीचा रुटप्लॅान व वेळापत्रक तालुका व जिल्हास्तरांवर सादर करणे बंधनकारक असेल.

७.गाव व ग्रामपंचायत तसेच तालुका निहाय गोळा केलेल्या कच-याचे वजन कि.लो सह तसेच कक्षात प्रक्रिया केलेले प्लास्टीक कचरा पुर्नचक्रिकरण संस्था किंवा कंपनी कडे वर्ग केलेले वजन कि.लो सह मासिक अहवाल संबंधित गट विकास अधिकारी पंचायत समिती व प्रकल्प संचालक,पाणी व स्वच्छता विभाग,जि.प.जळगांव यांना देणे बंधनकारक असेल.

८.निवड करण्यात आलेल्या संस्था/कंपनी/बचत गट यांनी प्रत्येक ग्रामपंचायती हद्दी मधील प्लास्टीक कचरा संकलन करुन ते बंद किंवा आवरण असलेल्या तसेच आतमध्ये कचरा वर्गीकरणसाठी कप्पे असलेल्या वाहनातुनच वहन करणे बंधनकारक असेल.

९.तालुक्यातील संबंधित ग्रामपंचायती कडुन कोणताही आर्थिक मोबदला न देता प्लास्टीक कचरा गोळा करुन तालुकास्तरावरील प्लास्टीक व्यवस्थापन कक्षा पर्यंत सदर कचरा संकलित करण्याची जबाबदारी संस्था/कंपनी/बचत गट ची असेल मात्र ग्रामपंचायत हद्दी मधील इतर भंगारवाले,दुकानदारं किंवा कुंटूंबे त्यांचे कडिल कचरा विकत देत असल्यास त्यांना त्यांची आवश्यक देय रक्कम अदा करुन सदर कचराही विकत घेण्याची मुभा निवड केलेल्या संस्था/बचत गट किंवा कंपनीस असेल व सदर कचराही तालुकास्तरावरील प्लास्टिक वेस्ट कक्षात पुढिल कार्यवाहीसाठी संकलीत करुन करार कालावधीप्रमाणे त्या पासून मिळणारे आर्थिक उत्पन्न संस्था/कंपनी/बचत गट यांचे असेल त्यावर जिल्हा परिषद चा कोणताही हक्क नसेल.

१०.कामगार कायदा अंतर्गत तालुकास्तरीय प्लास्टिक व्यवस्थापन युनिट वर कार्यरत किंवा नेमुणक केलेले मजुर किंवा कर्मचारी यांना किमान वेतन २४ फेब्रुवारी २०१५ चे अधिसुचनेप्रमाणे/कायदा प्रमाणे देय राहील सदर मजुर किंवा कर्मचारी यांना दिला जाणारा मोबदला किंवा पगार त्यांचे बँक खात्यामध्ये देणे बंधनकारक राहील.तसेच सर्व कामगारांचे PFजमा करणे व ESICअंतर्गत विमा उतरविण्याची जबाबदारी संबधित प्रस्तावित संस्था/कंपनी बचत गट यांची असेल.याबाबत काही तंटा निर्माण झाल्यास त्यास जिल्हा परिषद जळगांव जबाबदार राहणार नाही.

११.बालमजुर कायदयाचे पालन करणे संस्था/कंपनी/बचत गट यांना बंधनकारक राहील.

१२.दैनंदिन काम करतेवेळी (कोणतेही काम) गट इजा,अपघात अथवा मृत्यु संभवल्यास किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे अपघात झाल्यास त्याची भरपाई व इतर कायदेशिर जबाबदारी निवड केलेल्या संस्था/कंपनी/बचत गट यांची राहील.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

१३.संस्था/कंपनी/बचत गट यांची निवड झाल्यानंतर सदर संस्था/कंपनी/बचत गट यांनी करारनामा रु.५०० रक्कमेच्या मुद्रांक पेपरवर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,जि.प.जळगांव यांनी दिलेल्या विहीत नमुन्यात त्वरीत भरुन दयावा लागेल त्या बाबतचा खर्च संस्था/कंपनी/बचत गट यांना करावा लागेल.सदर करारनामा झालेनंतर कार्यदेश देण्यात येईल.

१४.एनवेळी म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.जळगांव यांनी वेळोवेळी सुचविले जाणारे कामातील बदल किंवा वेळोवेळी निर्गमित होणारे शासकीय आदेश,परिपत्रकाचे काटेकोर अनुपालन करणे संस्था/कंपनी/बचत गट यांचेवर बंधनकारक राहतील.

१५.कोणताही अटी व शर्ती असलेला प्रस्ताव स्विकारला जाणार नाही.

१६.निवड करण्यांत आलेल्या संस्था/कंपनी/बचत गट च्या देत असलेल्या सेवा बाबत तालुक्यातील कोणत्याही ग्रामपंचायतींचे तक्रारी प्राप्त झाल्यास व नियमानुसार तथ्य आढळल्यास संस्थेची नियुक्ती रदद करणे बाबतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.जळगांव यांनी राखुन ठेवलेले आहे.

१७.वरील सर्व अटी व शर्ती मान्य असलेले बाबत रु.५०० च्या स्टॅम्पपेपर प्रस्तावासोबत देणे अनिवार्य असेल.वरील सर्व अटी शर्ती नमुद करण्यांत यावे.

१८.इच्छुक असलेल्या संस्था/कंपनी/बचत गट कडुन प्राप्त प्रस्ताव पुर्णपणे किंवा अंशतः स्विकारणे अथवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,जळगांव यांनी राखून ठेवलेला आहे.

मिनल करनवाल (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगांव

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

## तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन (PWMU) प्रकल्प

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | ग्रामपंचायतीचे नांव | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अमळनेर | पातोंडा | |
| २ | भडगांव | बांबरुड प्र.ब. | |
| ३. | भुसावळ | फुलगांव | |
| ४. | बोदवड | राजुर | |
| ५. | चाळीसगांव | वाघळी | |
| ६. | चोपडा | अडावद | |
| ७. | धरणगांव | पाळधी खु | |
| ८ | एरंडोल | कासोदा | |
| ९. | जळगांव | पाथरी | |
| १०. | जामनेर | पहुरपेठ | |
| ११. | मुक्ताईनगर | अंतुर्ली | |
| १२. | पाचोरा | लोहारी बु | |
| १३. | पारोळा | देवगांव | |
| १४. | रावेर | चिनावल | |
| १५. | यावल | न्हावी प्र.या. | |

Signed by
Minal Karanwal
Date: 18-12-2025 21:16:51

मिनल करनवाल (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगांव

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner